दैनिक
# महा मेट्रो

कुऱ्हाड... झाडांवर, निष्ठेवरही! महाजनांची मुजोरी आता कार्यकर्त्यांवरही... पान २



वर्षे : ४ थे, अंक : ११, पुणे, रविवार, दि. २८ डिसेंबर, २०२५
VOL NO.4, ISSUE : 11 Pune, Sunday 28 December 2025
RNI N0.MAHMAR2022/87390
पाने : ४ किंमत : ३.००
Pages : 4 PRICE : 3.00

## राजकीय भूकंप! अजितदादांना सर्वात मोठा धक्का!

नाशिक-प्रतिनिधी
महा मेट्रो

महानगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील राजकारण चांगलेच तापले आहे. राज्यातील २९ महापालिकांसाठी १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार असून १६ जानेवारीला निकाल जाहीर होणार आहे. अशातच नाशिक महानगरपालिकेच्या निवडणुकीत मोठी आणि धक्कादायक घडामोड समोर आली आहे.

ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीला मोठा धक्का बसला असून मंत्री छगन भुजबळ यांचे अत्यंत विश्वासू आणि कट्टर समर्थक नेते यांनी थेट एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. या घडामोडीमुळे नाशिकच्या राजकारणात खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार मंत्री छगन भुजबळ यांचे निकटवर्तीय नेते कैलास मुदलियार यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत अधिकृत प्रवेश केला आहे. गेल्या काही दिवसांपासून मुदलियार आणि शिंदे गटामध्ये प्रवेशाबाबत चर्चा सुरू होती, अखेर आज हा पक्षप्रवेश पार पडला.

नाशिकमध्ये कैलास मुदलियार यांची ओळख ही भुजबळ यांचे कट्टर समर्थक आणि विश्वासू सहकारी अशीच होती. त्यामुळे त्यांच्या पक्षांतरामुळे राष्ट्रवादीला आणि विशेषतः छगन भुजबळ यांना हा मोठा राजकीय धक्का मानला जात आहे.

# प्रभाग एक मधुन सात हजार मतदार गायब!

## प्रभाग एकमध्ये वडगावशेरी व येरवड्यातील मतदारांची नावे; महापालिका निवडणूक कार्यालयातील कर्मचाऱ्यांच्या चुका

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे महापालिकेची निवडणुकीची रणघुमाळी सुरू असताना प्रभाग एक मधून तब्बल सात हजार नावे गायब झाली आहेत. या प्रभागातील ही नावे प्रभाग क्रमांक तीन लोहगाव- वाघोलीला जोडण्यात आली आहेत. ही नावे ( मतदार) सत्ताधारी भारतीय जनता पक्षाच्या उम ेदवारांच्या जवळचे नातेवाईक, मित्रमंडळी व भाजपाच्या विचारधारेची असल्यामुळे भाजपाच्या इच्छुकांची धाकधुक वाढली आहे.

प्रभाग एक मधील मतदारांचे स्थलांतर हेतुपुरस्सर झाल्याची टीका माजी नगरसेवक अनिल उर्फ बॉबी टिंगरे यांनी केली आहे .

पुणे महापालिकेच्या निवडणुकीत मतदार याद्यांचा मोठ्या प्रमाणात घोळ समोर आला आहे. प्रभाग क्रमांक एक कळस -धानोरी -लोहगाव मधील तब्बल सात हजार मतदारांची नावे प्रभाग क्रमांक तीन लोहगाव- वाघोली मध्ये स्थलांतरित केली आहेत. तर प्रभाग क्रमांक एक कळस- धानोरी- लोहगाव मध्ये प्रभाग क्रमांक पाच कल्याणीनगर -वडगावशेरी मधील नावे समाविष्ट झाली आहेत. या मतदारांच्या समोर पूर्ण पत्त्याच्या उल्लेख असताना ही नावे स्थलांतरित केली गेली आहेत.

यामध्ये मानवनिर्मित अर्थात म हापालिका निवडणूक कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा हस्तक्षेप असण्याची टीका अनिल टिंगरे यांनी केली आहे.

पुणे महापालिकेत सत्ताधारी भाजप पक्षाच्या इच्छुक व माजी नगरसेवक यांच्या प्रभागातील मतदार मोठ्या प्रम ाणात स्थलांतर केले आहे. मतदार याद्या मिळाल्यानंतर ही बाब पक्षाचे नगरसेवक, कार्यकर्ते यांच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी आक्षेप घेतले गेले. मात्र निवडणूक कार्यालयातील अधिका-यांनी त्याकडे दुर्लक्ष करून बघतो, सांगतो अशी उत्तरे दिल्याचे इच्छुकांनी सांगितले.

“एका प्रभागातील नावे दुस-या प्रभागात गेल्याच्या हरकती मतदारांनी नोंदविलेल्या आहेत. या हरकतींची पडताळणी करून पूर्ववत करण्यात येतील. ३ जानेवारीपर्यंत या याद्यांची दुरूस्ती होईल ”
- रवि पवार, उपायुक्त , पुणे महापालिका

“ कळस-धानोरी-लोहगाव प्रभाग क्रमांक १ मधील तब्बल सात हजार मतदारांची नावे इतरत्र स्थलांतरित करण्यात आली. त्यामुळे निवडणूकीत मताधिक्यावर परिणाम होऊ शकतो.”
अनिल ऊर्फ बॉबी टिंगरे, माजी नगरसेवक , पुणे महापालिका

“ संबंधित मतदार मतदान करू शकणार नाहीत. त्यामुळे मतदानाची टक्केवारी घटून उमेदवारांना फटका बसू शकतो. यंत्रणेने जाणिवपूर्वक याद्यांमध्ये घोळ केला आहे ”
शशी अण्णा टिंगरे , इच्छुक उमेदवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष ( अजित पवार गट)



## दोन्ही राष्ट्रवादीची चर्चा फिस्कटली; शरद पवार गटाची कॉंग्रेस, उद्धवसेनेशी चर्चा सुरू



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) या दोन्ही राष्ट्रवादीचे जागावाटप आणि निवडणूक चिन्हावरून मतभेद झाल्याने चर्चा फिस्कटली आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादीने महाविकास आघाडीच्या साथीनेच लढण्याचा निर्णय घेत कॉंग्रेस आणि उद्धवसेनेशी चर्चा सुरू केली आहे.

पुणे महापालिका निवडणुकीसाठी राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) या दोन्ही पक्षांच्या आघाडीसाठी शरद पवार गटाचे नेते माजी महापौर अंकुश काकडे, माजी स्थायी समिती अध्यक्ष विशाल तांबे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांची बारामती होस्टेलवर शुक्रवारी रात्री भेट घेतली. त्यावेळी जागावाटप आणि घड्याळ की तुतारी चिन्हावर लढायचे, याविषयी चर्चा झाली. शरद पवार गट तुतारी चिन्हासाठी ठाम होता. केवळ ३५ जागा देण्याचा प्रस्तावही शरद पवार गटाला अमान्य होता. त्यामुळे चर्चा फिस्कटली.

राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाशी चर्चा फिस्कटल्यानंतर शरद पवार गटाने तातडीने म हाविकास आघाडीच्या घटक पक्षांशी चर्चा सुरू केली आहे. कॉंग्रेस, उद्धवसेना, राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) या तिन्ही पक्षांची उशिरा रात्री संयुक्त बैठक झाली. या बैठकीला राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) चे विशाल तांबे, अंकुश काकडे, मनाली भिलारे, अश्विनी कदम आणि आमदार बापू पठारे, तर कॉंग्रेसकडून अरविंद शिंदे, अभय छाजेड, रमेश बागवे आणि उद्धवसेनेचे वसंत मोरे, गजानन थरकुडे, संजय मोरे हे उपस्थित होते.

## ‘म्हाडा’च्या सोडतीला परवानगी द्या; राज्य निवडणूक आयोगाकडे ‘म्हाडा’ सभापतींची मागणी

पुणे -प्रतिनिधी
महा मेट्रो

म्हाडाने काढलेल्या ४ हजार १८६ घरांसाठी सोडतीला आचारसंहितेचा अडसर निर्माण झाल्याने आता राज्य निवडणूक आयोगाकडे सोडत जाहीर करण्यासाठी परवानगी मागण्यात आली आहे. ‘म्हाडा’चे सभापती माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी ही मागणी केली आहे. याबाबत मुख्य सचिवांशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे आयोगाकडून सांगण्यात आले. यावर निवडणूक आयोग काय निर्णय घेणार याकडे लक्ष लागले आहे.

पुणे गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळाने ११ सप्टेंबर रोजी २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील ४ हजार १८६ घरांसाठी सोडत काढली आहे. या सोडतीमध्ये संपूर्ण राज्यातून नागरिकांचे एकूण २ लाख १५ हजार ९६५ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यांची छाननी प्रक्रिया गेल्या काही दिवसांपूर्वी पूर्ण झाली. ही सोडत ११ डिसेंबर रोजी काढण्यात येणार होती. मात्र, अर्जांच्या विक्रमी संख्येमुळे ती काढता आली नाही.

त्यानंतर लागलीच महापालिका निवडणुकांची आचारसंहिता लागू झाल्याने सोडत लांबणीवर पडली. ती जाहीर करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाची परवानगी घ्यावी लागणार आहे. त्यामुळे सोडतीस परवानगी मिळावी, अशी मागणी म्हाडाचे सभापती शिवाजीराव आढळराव पाटील यांनी राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांच्याकडे केली आहे. याबाबतचे निवेदनही वाघमारे यांना देण्यात आले आहे.

## भाजपच्या १२५ जागांच्या दाव्यावर अजितदादांच्या राष्ट्रवादीचा जोरदार पलटवार

पिंपरी-प्रतिनिधी
महा मेट्रो

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार गट) यांच्यातील राजकीय संघर्ष तीव्र होत चालला आहे. भाजपचे निवडणूक प्रमुख आम दार शंकर जगताप यांनी १२८ पैकी तब्बल १२५ नगरसेवक भाजपचे निवडून येतील, असा आत्मविश्वासाने केलेला दावा आता वादाच्या भोवऱ्यात सापडला आहे. या दाव्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार) पक्षाचे शहराध्यक्ष योगेश बहल यांनी तिखट शब्दांत उत्तर देत भाजपवर थेट गंभीर आरोप केले आहेत.




भाजपचे १२५ नगरसेवक निवडून आले, तर मी कायम चे राजकारण सोडेन, असे खुले आव्हान देत बहल यांनी भाजपच्या दाव्याची खिल्ली उडवली. भाजपकडून पक्षात येणाऱ्यांना ‘ईव्हीएममध्ये दोन ते अडीच हजार मते आपोआप मिळतील’ असे सांगितले जाते, असा धक्कादायक आरोप त्यांनी केला. या वक्तव्यामुळे शहरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे.

भाजपचे चार आमदार असून प्रत्येक आमदार २५ नगरसेवक निवडून आणेल, या भ्रमात भाजप असल्याचा टोला बहल यांनी लगावला. शंभर जागा मिळविणेही भाजपसाठी अवघड असल्याचा दावा करत सात ते दहा प्रभागांत भाजपचा एकही उमेदवार निवडून येणार नाही, असे भाकीत त्यांनी केले. भाजप अतिआत्मविश्वास आणि घमेंडीत असल्याचे सांगत, फोडाफोडीचे राजकारण भाजपकडून सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

पक्ष सोडून जाणाऱ्या माजी नगरसेवकांवरही बहल यांनी टीका करत, त्यांना स्वतःवरच विश्वास नसल्यामुळे त्यांनी राष्ट्रवादीची साथ सोडल्याचे सांगितले.

## मद्यपी वाहनचालक, हुल्लडबाजांवर कडक कारवाईचे आदेश; निवडणूक, अभिवादन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयात बैठक




पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

नववर्षाच्या पार्श्वभूमीवर मद्यपी वाहनचालकांविरुद्ध कडक कारवाईचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिले आहेत. आगामी म हापालिका निवडणूक, कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तालयात शुक्रवारी बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत पोलीस आयुक्तांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

नववर्ष स्वागताच्या पार्श्वभूम ीवर शहरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मद्यप्राशन करून भरधाव वाहने चालविणाऱ्या वाहनचालकांविरुद्ध कारवाई, तसेच शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शुक्रवारी (२६ डिसेंबर) पोलीस आयुक्तालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले.

या बैठकीत पोलीस आयुक्त अमि तेश कुमार यांनी शहरातील वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. आगामी महापालिका निवडणूक, कोरेगाव भीमा विजयस्तंभ अभिवादन सोळा, तसेच नववर्षाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी शहरातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रमुखांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मद्यप्राशन करुन भरधाव वेगाने वाहनचालकांविरूद्ध करण्यात येणारी कारवाई तीव्र करण्यात यावी. चौकाचौकात नाकाबंदी करुन वाहनचालकांची तपासणी करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

नववर्ष स्वागतासाठी लष्कर, बंडगार्डन, कोरेगाव पार्क, बाणेर, बालेवाडी परिसरात गर्दी होती. या भागात पबची संख्या मोठी आहे. या भागातील पब, रेस्टॉरंटच्या परिसरातील गैरप्रकार होणार नाहीत, याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. गैरप्रकार रोखण्यासाठी पब, रेस्टॉरंट, हॉटेलच्या परिसरात गस्त घालण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. वाहतूक नियम धुडकावणे, मद्यप्राशन करुन भरधाव वाहने चालविणे, तसेच हुल्लडबाजांवर कारवाई करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

## महाराष्ट्र क्रिकेट संघटनेच्या आजीव सदस्यांमध्ये राजकीय घुसखोरी

पुणे -प्रतिनिधी
महा मेट्रो

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेची निवडणूक ६ जानेवारी २०२६ रोजी होत असून त्यासाठी आजीव सदस्यांमध्ये जोरदार अवैध घुसखोरी घडवून आणण्यात आली आहे. आजीव सदस्यांमध्ये सुप्रिया सुळे यांनी मुलगी रेवती सदानंद सुळे आणि सध्याचे एमसीए अध्यक्ष, आमदार रोहित पवार यांची पत्नी कुंती पवार यांच्यासह अनेक राजकीय व्यक्तींचा समावेश करण्यात आला आहे.

या अवैध घुसखोरीमुळे आजीव सदस्यांची संख्या १६१ वरून थेट ५७२ वर गेली आहे. आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एमसीए सदस्यांमध्ये अवैध घुसखोरी घडवून आणण्यात येणार असल्याचे वृत्त ’लोकमत’ने प्रसिद्ध केले होते. तेव्हा एमसीए अध्यक्ष रोहित पवार यांनी ही शक्यता फेटाळून लावली होती. आता त्यांच्याच नेतृत्वाखाली ही राजकीय घुसखोरी घडवून आणण्यात आली आहे.

महाराष्ट्र क्रिकेट संघटनेला आजीव सदस्यांमध्ये वाढ करण्याचा अधिकार असला तरी निवडणुकीच्या आधीच त्यांना या अधिकाराची जाणीव का झाली हा प्रश्न अनुत्तरित आहे. क्रिकेट संघटनेत खेळाशी संबंधित व्यक्ती, संस्था, संघटनांचा समावेश व्हावा अशी साधारण अपेक्षा असते पण एमसीएमध्ये राजकीय घुसखोरीमुळे महाराष्ट्राच्या क्रिकेटचे आणि खेळाडूंचे नुकसान होणार आहे. आपल्या मुलाने क्रिकेटपटू व्हावे अशी अपेक्षा करून त्यांना मैदानावर पाठवणाऱ्या पालकांच्या विश्वासालाही यामुळे तडा जाणार आहे, असे एमसीएच्या एका सदस्याने सांगितले. याबाबत एमसीएचे अध्यक्ष रोहित पवार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.



आजीव सदस्यांची संख्या वाढवताना अध्यक्ष रोहित पवार यांनी स्वतः च्या कुटुंबातील व्यक्तींचाच भरणा करून महाराष्ट्र क्रिकेट संघटनेची फॅमिली ट्रस्ट केल्याचा आरोप एमसीए सदस्याांनी केला आहे.

क्लब, महाविद्यालय गटात कॉंग्रेस, राष्ट्रवादीचा प्रभाव असलेल्या संघटनांनाच सदस्यत्व देत महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचा राजकीय आखाडा केल्याचा आरोपही सदस्य करत आहेत.

क्लब गटात ७ स्पोर्ट्स, आर्यन्स क्रिकेट ॲकॅडमी, केडन्स क्रिकेट ॲकॅडमी, क्रिकेट ॲकॅडमी ऑफ ट्रिनिटी या मर्जीतील क्लबला सदस्यत्व देताना नामवंत कसोटी कर्णधार दिलीप वेंगसरकर क्रिकेट अकादमीला (डीव्हीसीए) डावलण्यात आले आहे. वेंगसरकर अकादमी १८ वर्षांपासून पुण्यात कार्यरत असून त्यांनी भारतासाठी ऋतुराज गायकवाड, विकी ओत्सवाल यांसारखे खेळाडू दिले. तसेच सर्व वयोगटात महाराष्ट्र क्रिकेट संघासाठी सुमारे १०० खेळाडू त्यांनी तयार केले आहेत.

संपादकीय....

# राज्यातील तंत्र शिक्षण विभागात कोट्यवधी रूपयांचा घोटाळा

राज्यातील महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हा परिषदा अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या (लोकल बॉडी ) 'विकास कामांचे ऑडिट' हे सरकारी तंत्रनिकेतने व आभियांत्रिकी महाविद्यालाये मार्फत करण्यात येते. हे ऑडिट झाल्यानंतर महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा, जिल्हापरिषदा या शासकीय तंत्रनिकेतने व आभियांत्रिकी महाविद्यालयांना त्यांच्या कामाचा मोबदला म्हणून यांना वीस टक्के मानधन दिले जाते. मात्र, थर्डपार्टी संस्था अनेक रिपोर्ट महाविद्यालयातच बसून बनवले जात आहेत. यासह ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे तयार केले जात असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आले आहे. त्यामुळे 'विकासकामे' निकृष्ट दर्जाची होत आहेत. त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील कोट्यवधी रूपये खर्च करून बांधलेल्या इमारतींचे, रस्ते, पूल निकृष्ट दर्जाची असल्यामुळे धोकादायक स्थितीत किंवा अल्पआयुष्य ठरत असल्याचे वास्तव आहे.

महापालिका, नगरपालिका, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांचा अर्थसंकल्प कोटयावधी रूपयांचा असतो. यासह या स्थानिक स्वराज्य संस्थांना केंद्र व राज्य सरकाकडून देखील थेट निधी मिळत असतो. यानिधी मधुन ते विविध विकासकामे करतात. ही विकासकामे चांगली दर्जेदार व्हावीत म्हणून या कामांचे थर्डपार्टी ऑडिट केले जाते. हे ऑडिट राज्यातील सरकारी तंत्रनिकेतन व आभियांत्रिकी महाविद्यालयांच्या मार्फत केले जाते. महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, कर्मचारी करतात. त्या मोबदल्यात त्यांना त्यांच्या वार्षिक पगाराच्या वीस टक्के टक्के मानधन दिले जाते. मात्र, अनेक प्राध्यापकांनी कार्यालयातच बसूनच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विकासकामांचे ऑडिट केले आहे. धक्कादायक बाब म्हणजे ठेकेदारांच्या मर्जी प्रमाणे हे ऑडिट केल्याचे उघड झाले आहे.

सरकारी निर्णया नुसार ३१ मे २००३ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना त्यांच्या वार्षिक एकूण मुळ वेतनाच्या वीस टक्के रक्कम घेता येते. म्हणजेच प्राचार्य, शिक्षक यांना जास्तीत जास्त सहा लाख घेता येते. मात्र, सामाजिक कार्यकर्ते अभिजित खेडकर व डॉ अभिषेक हरिदास यांनी राज्यातील माहिती मागवली असता अनेक प्राचार्य व शिक्षकांनी कोटयावधी रुपये मानधन घेतले असल्याची माहिती 'माहिती अधिकारात' मिळाली आहे. ही रक्कम म्हणजे पगाराच्या दुप्पट, तिप्पट तर कोठे दहापट देखील मानधन घेतले आहे. महाविद्यालयातील चर्तुथ कर्मचारी सुद्धा मालामाल झाले आहेत.

त्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांमधील विकासकामे चांगल्या दर्जाची होताना दिसत नाहीत. दरवर्षी रस्ते, सांडपाणी, जल वाहिन्यांची कामे होत असतात. गल्ली बोळ क्रॅाक्रिटीकरणाची काम वर्षानुवर्षे होत असतात. त्यामुळे कामासाठी निधीची तरतूद न करता निधीसाठी विकासकामे दाखविली जातात.

**सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्युडी) मोठे भ्रष्टाचार खाते**

सार्वजनिक बांधकाम विभाग (पीडब्ल्यूडी) मध्ये सर्वात जास्त भ्रष्टाचार असल्याचे दस्तुरखुद्द सर्वोच्य न्यायालयाचे न्यायमूर्ती अभय ओक यांनी येरवड्यातील फौजदारी न्यायालयाचे उद्घाटन करताना सांगितले होते. त्यांनी सांगितले की जेवढा निधी केंद्र व राज्य सरकार मंजूर करते एवढ्या निधीमध्ये अनेक न्यायालये उभी राहिली असती. याचा अर्थ अप्रत्यक्षपणे किती मोठा भ्रष्टाचार पीडब्ल्यूडीमध्ये आहे हे कळून येते. तर महापालिका, नगरपालिका, नगरपरिषद, ग्रामपंचायत, जिल्हा परिषद येथील विकासकामांची निविदा तीस ते चाळीस टक्केना कमी भरली जाते त्यामुळे अशा कामांचे ऑडिट थर्ड पार्टीने केल्यास काय दर्जाचे असणार आहे याची कल्पनाच केलेली बरी.

# महसूली शब्दांचे जाणून घेऊया अर्थ!

महाराष्ट्र शासन

महसूल विभाग हा प्रशासनाचा कणा म्हणून ओळखला जातो. महसूल विभागाच्या सेवा प्रभावीपणे व पारदर्शकरित्या नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कामकाजात ई-प्रणालीचा वापर होत आहे. सातबारा उतारा, फेरफार नोंद, विविध परवानग्या, शासकीय जमीनीचे व्यवस्थापन, शस्त्र परवाना, कर वसुली, नैसर्गिक आपत्तीमध्ये मदत व पुनर्वसन कार्य या विभागामार्फत चालते. महसूल विभाग हा नागरिकांचा जिव्हाळ्याचा विभाग असला तरी यातील काही शब्दांचे अर्थ समजून घेताना क्लिष्ट वाटतात. या लेखाच्या माध्यमातून विभागाशी संबंधित कामाशी निगडीत अशाच काही शब्दांचे अर्थ जाणून घेऊया !

**■ निस्तारपत्रक**

निस्तारपत्रक म्हणजे गावातील सर्व सार्वजनिक जमिनींच्या वापराबाबतचा अधिकृत नकाशा व नियमांची यादी. गावात ज्या जमिनी वैयक्तिक मालकीच्या नसतात जसे की तलाव, रस्ते, नदीकाठची जमीन, स्मशानभूमी, चराई जमीन, सार्वजनिक जागा त्या जमिनींचा कशासाठी आणि कसा वापर करायचा याची संपूर्ण योजना या पत्रकात दिलेली असते.

**■ निहित**

निहित म्हणजे जमीन किंवा मालमत्ता एखाद्या व्यक्तीला किंवा संस्थेला वापरासाठी देणे, परंतु मालकी हक्क न देणे. ज्या व्यक्तीकडे जमीन निहित केली जाते, त्याची स्थिती कनिष्ठ धारकासारखी असते. म्हणजेच तो जमीन फक्त दिलेल्या मर्यादेत वापरु शकतो.जमीन ज्या विशिष्ट कारणासाठी निहित केली आहे ते काम किंवा उद्देश शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येत नाही.

**■ निखात निधी**

निखात निधी अर्थात जमिनीखाली लपलेला किंवा दडलेला मौल्यवान खजिना जसे की दागिने, सोने- चांदीची नाणी किंवा रुपये किंवा मौल्यवान वस्तू. जमीन नांगरताना, खोदताना किंवा काम करताना असा मौल्यवान खजिना सापडता तर भारतीय निखात निधी कायदा १८७८ नुसार सरकारला कळविणे तसेच पुढील प्रक्रिया करणे आवश्यक असते.

**■ कनकूत**

कनकूत म्हणजे शेतातील उभ्या पिकाच्या उत्पादनाचा अंदाज लावण्याची महसूली पद्धत. यामध्ये पिकाची वाढ, दाण्यांची संख्या आणि पिकाची एकूण घनता यासारख्या घटकांचा विचार करुन कापणीनंतर किती उत्पादन मिळेल याचा अंदाज घेतला जातो.

**■ जिन्नसवार**

जिन्नसवार म्हणजे गावात घेतल्या जाणाऱ्या मुख्य पिकांची अधिकृत नोंद. गावात कोणती पिके जास्त प्रमाणात घेतली जातात, कोणते पीक त्या भागाचे प्रमुख उत्पादन मानले जाते, याची माहिती या यादीत असते. ही नोंद महसूल नोंदीसाठी उपयुक्त ठरते.

**■ वरसाल**

एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यावर किंवा त्याने मृत्यूपत्र लिहून ठेवले असल्यास, त्या आधारावर मालमत्तेची नावात होणारी बदल नोंद म्हणजे वरसाल.

**■ पारडी जमीन**

पारडी जमीन म्हणजे गावठाणातील घरांच्या लगत किंवा सभोवती असलेली, शेतीयोग्य पण मुख्यत: घराशी संबंधित वापरात येणारी लागवडीची जमीन.

**■ स्वामित्वधन**

जमिनीचा पृष्ठभाग कोणच्याही मालकीचा असला तरी त्याखालील खनिजे शासनाच्या मालकीची असतात. कोणत्याही व्यक्तीस अशा खनिजाचे उत्खनन करुन त्याचा उपयोग करावयाचा असल्यास त्यास त्या खनिजांचे स्वामित्वधन (रॉयल्टी) शासनास द्यावे लागते. तसेच त्यावर स्थानिक उपकरही भरावे लागतात.

■ संकलन : विभागीय माहिती कार्यालय, पुणे

# कुऱ्हाड... झाडांवर, निष्ठेवरही!

## महाजनांची मुजोरी आता कार्यकर्त्यांवरही...

**राजकारणात विजय महत्त्वाचा असतो, पण तो निष्ठा, तत्व आणि कार्यकर्त्यांच्या आत्मसन्मानावर उभारला जात असेल, तर तो विजय दीर्घकाळ टिकत नाही. नाशिकमध्ये भाजपने घडवलेला घाऊक पक्षप्रवेश हा केवळ रणनीतीचा भाग नसून, पक्षाच्या अंतर्गत मूल्यव्यवस्थेची कसोटी पाहणारा प्रकार ठरतो आहे. स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनीच घडलेली ही घटना भाजपच्या घोषित तत्वांशी विसंगत वाटते. सत्तेच्या जोरावर निर्णय लादण्याची वृत्ती, निष्ठावंत कार्यकर्त्यांचा विरोध दुर्लक्षित करण्याची भूमिका आणि 'जिंकू तेच योग्य' या मानसिकतेचे वाढते वर्चस्व यामुळे पक्ष आणि मतदार यांच्यातील अंतर अधिकच वाढण्याची चिन्हे दिसत आहेत. झाडांवर उगारलेली कुऱ्हाड आज निष्ठेपर्यंत येऊन पोहोचली आहे, ही बाब दुर्लक्षित करता येणार नाही.**



भाजपचे सर्वप्रिय नेतृत्व म्हणवल्या जाणाऱ्या स्वर्गीय अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनीच नाशिकमध्ये भाजपने तत्वनिष्ठेचे बोचके गोदावरीच्या पाण्यात भिरकावले. सत्तेच्या मदांधतेत आणि विजयाच्या कैफात स्वपक्षीय निष्ठावंत कार्यकर्त्यांना, तसेच मतदारांनाही गृहीत धरण्याचे पातक भाजपचे संकटमोचक म्हणवल्या जाणाऱ्या गिरीश महाजन यांच्याकडून घडले. निष्ठावंत कार्यकर्त्यांनी संतापून महाजनांना धारेवर धरले, तरी कशाकशाला न जुमानता त्यांनी विरोधातील सर्वपक्षीय स्थानिक नेत्यांना पावन करून भाजपमध्ये घेतलेच. महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर सध्या सगळीकडेच जोडाजोडी आणि फोडाफोडीच्या राजकारणाला वेग आला असला, तरी भाजपने नाशिकमध्ये जे केले ते क्लेशदायीच नव्हे, तर संतापजनकही ठरते.


विरोधी आघाडीतील कॉँग्रेस, उद्धवसेना, मनसे आणि राष्ट्रवादी कॉँग्रेस (शरद पवार) या चार पक्षांमधील दोन माजी महापौर, स्थायी समितीचे दोन माजी सभापती, एक माजी आमदार व अन्य माजी नगरसेवक अशांचा घाऊक पक्ष-प्रवेश घडवण्यात आला. भाजपच्या नाशिक निवडणूक प्रमुख आमदार देवयानी फरांदे यांच्यासह बहुतांश नेत्यांना अंधारात ठेवून हा प्रवेश सोहळा एका रात्रीत ठरवला गेला. भाजपच्या निष्ठावंत निवडणूक इच्छुकांमध्ये, तसेच स्थानिक नेत्या-कार्यकर्त्यांमध्ये कमालीची अस्वस्थता पसरली. फरांदे यांच्यासह बरेच निष्ठावंत नेते-कार्यकर्ते संतापून रस्त्यावर उतरले. गिरीश महाजन यांना भाजप कार्यालयाबाहेरच घेराव घालून कार्यकर्ते जाब विचारताहेत, असे अभूतपूर्व चित्र पाहावयास मिळाले. कार्यकर्त्यांचा विरोध इतका तीव्र होता की, नव्याने पक्षात येणाऱ्यांना पोलिस बंदोबस्तात आणि चक्क मागच्या दरवाजाने भाजप कार्यालयात आणावे लागले. हा सगळा विरोध अक्षरश: फाट्यावर मारत महाजनांनी वादग्रस्त पार्श्वभूमी असलेल्या आयारामांच्या गळ्यात कमळ चिन्हाची उपरणी घातलीच ! कॉँग्रेसचे शाहू खैरे यांचा अपवाद वगळता इतर साऱ्यांनी आपापल्या स्वार्थासाठी किमान तीन-चार पक्षांतरे केली आहेत. विधानसभा निवडणुकीत तिकीट न मिळाल्याने भाजपचा त्याग करून मनसेत जावून निवडणूक लढलेले आणि त्यानंतर मनसेचे प्रदेश सरचिटणीस बनलेले दिनकर पाटील तसेच उद्धवसेनेचे नेते, माजी महापौर विनायक पांडे हे दोघे तर आदल्याच दिवशी ठाकरे बंधू एकत्र आल्याबद्दल एकमेकांना पेढे भरवत ढोल-ताशांच्या गजरात रस्त्यावर नाचले होते. चोवीस तासांत हे दोघे बिनदिक्कतपणे भाजपमध्ये दाखल झाले. हे असे आपण का केले, याचे कसलेही गुळमुळीत खुलासे न देता 'आपण पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी भाजपत येत आहोत', असे अगदी रोखठोक उत्तर उभयतांनी माध्यमांसमोर दिले.

माजी आमदार नितीन भोसले आणि माजी महापौर यतिन वाघ हे देखील राजकीय सोयीसाठीच भाजपच्या वळचणीला आले आहेत. भाजपने सुद्धा विरोधी आघाडीतील सक्षम नेत्यांना आणि प्रस्थापितांना आपल्याकडे खेचून विरोधक शिल्लकच ठेवायचे नाहीत, असा गुजरात पॅटर्न नाशिकमध्ये राबविला. गिरीश महाजन या प्रयोगाचे कर्तेधर्ते आणि त्यांचाही याबद्दल एक जळगाव पॅटर्न आहेच. त्यामुळे निष्ठावंतांचा वर्ग कमालीचा दुखावला गेला आहे. तसेही नाशिक अपवाद नाही. चंद्रपूर म्हणजे चांद्यापासून बांद्यापर्यंत 'आतले विरुद्ध बाहेरचे' असा वाद भाजपमध्ये उफाळला आहे. ही घाऊक भरती म्हणजे वास्तवात बाळसे नसून, सूज आहे. संधीसाधू राजकारणासाठी भाजपला आपलेसे करणाऱ्या मंडळींच्या निष्ठा एवढ्या निसरड्या असतात की, वेळ येताच भाजपला टांग देण्यास ही मंडळी जराही मागेपुढे पाहणार नाहीत. पण, सत्तातूर भाजपला त्याची काहीही फिकीर नाही. नाशकात गिरीश महाजनांनी ज्या आविर्भावात हे सारे केले, त्यातून पक्ष कार्यकर्त्यांसह लोकांना गृहीत धरण्याची मनोवृत्ती आणि सत्तेचा मद उघडपणे पाझरताना दिसतो. निवडणूक जिंकण्याची झिंग चढलेला भाजप त्या नादात जरी निष्ठा, नैतिकता याकडे डोळेझाक करत असला, तरी सामान्य मतदार उघड्या डोळ्याने हे सारे पाहतो आहे. वेळ येताच आणि समोर जरा बरा पर्याय दिसताच सत्तेची धुंदी उतरवायला मतदार मागेपुढे पाहणार नाही. महाजनांची दांडगाई केवळ पक्षप्रवेशावेळीच दिसली असे नाही. आधी तपोवनातील अठराशे झाडे तोडण्याच्या मुद्द्यावर अशीच मुजोरी महाजनांनी दाखविली. परिणामी, सरकारवर प्रचंड टीका झाली. नाशिककर रस्त्यावर उतरले. त्यातून धडा शिकण्याऐवजी महाजनांनी आता थेट आपल्याच पक्षाचे कार्यकर्ते अंगावर घेतले आहेत. झाडांवर कुऱ्हाड उगारलीच, तशी निष्ठेवरही ! संकटमोचक कसले, ते पक्ष व सरकारपुढे एकामागून रोज नवे संकट उभे करीत आहेत. त्याचा परिणाम लगेच दिसला नाही, तरी कधी ना कधी दिसेलच.

# निवडणूक कामात शिक्षकच का? समोर दहावी, बारावीच्या परीक्षाही...

**लोकशाही टिकवण्यासाठी निवडणुका अपरिहार्य आहेत; पण त्या प्रक्रियेचा भार समाजातील कोणत्या घटकावर किती टाकायचा, याचे भानही प्रशासनाला असायला हवे. सध्या सुरू असलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर, ऐन शैक्षणिक सत्राच्या अखेरीस शिक्षकांना निवडणूक कामात मोठ्या प्रमाणावर गुंतवले जात आहे. फेब्रुवारीत होणाऱ्या दहावी-बारावीच्या निर्णायक परीक्षांच्या तोंडावर हा निर्णय केवळ प्रशासकीय सोयीचा आहे की तो शिक्षणव्यवस्थेच्या हिताचा आहे, याचा गंभीर विचार होणे आवश्यक आहे. लोकशाहीची जबाबदारी पार पाडताना विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड होत असेल, तर त्या व्यवस्थेची दिशा आणि प्राधान्यक्रम यांचे पुनर्मूल्यांकन करण्याची वेळ निश्चितच आली आहे.**

'एक देश एक निवडणूक' या संकल्पनेचा कितीही गाजावाजा झाला तरी देशाच्या कानाकोपऱ्यात कोणत्या ना कोणत्या निवडणुका सतत होतच असतात. अगदी ग्रामपंचायतींपासून ते लोकसभेपर्यंत हा निवडणुकांचा धडाका राजकीय पक्षांचे नेते व कार्यकर्त्यांना सतत गुंतवून ठेवतो. त्यामुळे आदर्श कल्पना म्हणून देशभरात एकाचवेळी सगळ्या निवडणुका घेण्याच्या कितीही घोषणा झाल्या तरी हा सुविचार कधी प्रत्यक्षात अनुभवता येईल, अशी काही चिन्हे नाहीत. किंबहुना त्या घोषणा करणाऱ्यांना तरी खरेच मनातून तशी इच्छा आहे की नाही ही शंका यावी, अशी एकंदर परिस्थिती आहे. मागील वर्षी सहा महिन्यांच्या अंतराने लोकसभा व विधानसभा निवडणूक पार पडली. त्यानंतर काही ग्रामपंचायतींची निवडणूक झाली आणि आता गेली नऊ-दहा वर्षे रखडलेल्या नगरपालिका-नगरपंचायती, महापालिका व जिल्हा परिषद, पंचायत समित्या अशा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीची रणधुमाळी सुरू आहे. यातल्या नगरपालिका-



नगरपंचायतींच्या निवडणुकांचा धुरळा खाली बसण्याआधी महापालिका निवडणुकीचा बिगुल वाजला आहे.

नव्या वर्षाच्या पहिल्या महिन्याच्या मध्यात या निवडणुकीचे निकाल लागेपर्यंत पंचायत समित्या व जिल्हा परिषद निवडणुकीचा रणसंग्राम सुरू झालेला असेल. कारण, सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशानुसार ३१ जानेवारीच्या आत या सगळ्या निवडणुका राज्य निवडणूक आयोगाला आटोपायच्या आहेत. असो. हा सगळा गदारोळ आता विचारात घेण्याचे कारण म्हणजे निवडणुकांचे हे अवजड व अवघड धनुष्य पेलणारी प्रशासकीय यंत्रणा. एकतर केंद्रीय तसेच राज्य निवडणूक आयोगाकडे स्वत:चे कोणतेही मनुष्यबळ नाही. मतदारयाद्या तयार करण्यापासून ते त्या वेळोवेळी अद्ययावत करण्यापर्यंत, अगदी त्यातील दुरुस्तीसाठीचीही सगळी कामे महसूल यंत्रणेला करावी लागतात. ती यंत्रणा कमी पडली की जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून जिल्ह्या-जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी जिल्हा परिषद व इतर यंत्रणांमधून हवे ते व हवे तेवढे कर्मचारी अधिग्रहित करतात. प्रत्यक्ष निवडणूक पार पाडणे हे अत्यंत जोखमीचे घटनादत्त काम असल्यामुळे त्यासाठी प्रामुख्याने शिक्षकांवर जबाबदारी टाकली जाते. शासकीय व गैरशासकीय शाळांची संख्या मोठी, त्यातील शिक्षकांचीही संख्या मोठी आणि निवडणूक पार पाडण्यासाठी लागणाऱ्या सुशिक्षित मनुष्यबळाची गरजही मोठी, यामुळे गरज किंवा मागणी व पुरवठा ही दोन्ही सूत्रे लक्षात घेऊन सगळ्या निवडणुकांचे ओझे शिक्षकांच्या खांद्यावर येऊन पडते. त्याबद्दल नाराजी व्यक्त करण्याची किंवा ते काम नाकारण्याची सोय नसते. कारण, निवडणूक आयोगाच्या आदेशाची अंमलबजावणी करताना निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांना जास्तीचे अधिकार प्राप्त झालेले असतात. जनगणनेसह वेगवेगळ्या प्रकारची मोजणी, शिरगणती किंवा या निवडणुका अशा नानाविध गैरशैक्षणिक कामांचा बोजा शिक्षकांना असह्य झाल्याच्या आणि परिणामी शैक्षणिक कामांकडे दुर्लक्ष होत असल्याच्या कितीही तक्रारी झाल्या तरी त्याकडे ना शासन लक्ष देत, ना समाज त्यांची दखल घेतो.

मतदानावर परिणाम होऊ नये म्हणून आपण उन्हाळ्यात निवडणुका टाळतो. परिणामी त्या शैक्षणिक सत्र सुरू असतानाच घ्याव्या लागतात. यंदा तर ऐन शैक्षणिक सत्राच्या अखेरीस ही सगळी कामे शिक्षकांच्या वाट्याला आली आहेत. फेब्रुवारीत होणाऱ्या दहावी-बारावीच्या परीक्षा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांच्या आयुष्याला वळण देणाऱ्या या टप्प्यावर अभ्यासक्रम पूर्ण करायचे आहेत. परीक्षेच्या दृष्टीने त्यांची पुरेशी उजळणी करून घ्यायची आहे. मार्च महिन्यातील इतर परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांकडून करून घ्यायची आहे आणि अशावेळी ही निवडणुकीची कामे पुढ्यात येऊन पडली आहेत. दर पाच वर्षांनी येणाऱ्या निवडणुका आणि विद्यार्थ्यांच्या आयुष्यात एकदाच येणारी दहावी किंवा बारावीची परीक्षा यातील प्राधान्याबद्दल शिक्षकांना निर्णय घ्यायचा आहे.

खरेतर अशावेळी राज्य सरकारने, विशेषत: प्रशासनाने अन्य पर्याय शोधायला हवेत. ज्यांचा विद्यार्थ्यांसारख्या घटकांच्या भवितव्याशी तसा संबंध नाही, अशा शासनाच्या इतर विभागातील कर्मचारी-अधिकारी निवडणुकीच्या कामासाठी वापरणे, निवडणूक किंवा अशा तत्सम कामांसाठी एक अस्थायी फळी तयार करून ठेवणे यांसारख्या पर्यायांचा विचार करायला हवा.

दैनिक 'महा मेट्रो' प्रकाशक, मालक, संपादक दिलीप कुऱ्हाडे यांनी श्री समर्थ एंटरप्रायजेस, शॉप न. १, बेसमेंट, वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे - ४११०३० (महाराष्ट्र) येथे छापून फ्लॅट नं.९, फ्रेंडस्‌ पॅराडाईज सोसायटी, शिरोळे रोड, संभाजी बागेच्या समोर, शिवाजीनगर, पुणे-४११००४ येथे प्रकाशित केले. दूरध्वनी क्रमांक २०-४००४६६०९, मोबाईल : ९९२२९३०१९५, Email-mahametronews.pune@gmail.com या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामध्ये व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
RNI NO. MAHMAR2022/87390 MAHA METRO This Daily Owner, Publisher, Editor, is Mr. Dilip Kisan Kurhade Printed at Shree Samarth Printers, Shop No.1, Besment, Vartak Apartment, 499, Shaniwar Peth, Pune - 411030 and Published at Flat No. 9, Friends Paradies Society, Shirole Road, Opp. Sambhaji Park, Shivaji Nagar, Pune - 411004.

# दुचाकी वाहनांसाठी नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकांसाठी आगाऊ अर्ज व लिलाव प्रक्रिया जाहीर

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथे दुचाकी वाहनांसाठी नवीन नोंदणी मालिका सुरू करण्यात येत असून, आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक तीनपट व नियमित शुल्क भरून राखून ठेवण्याकरीता आगाऊ अर्ज स्वीकारण्यात येणार आहेत.




चारचाकी वाहनांकरिता आकर्षक व पसंतीचे नोंदणी क्रमांक हवे असल्यास इच्छुक वाहनधारकांनी २९ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या कार्यालयीन वेळेत विहित नमुन्यातील अर्ज, डीडी, पत्त्याचा पुरावा, ओळखपत्र व पॅनकार्डच्या साक्षांकित प्रतींसह प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे येथील खाजगी वाहन विभागात सादर करावेत. एखाद्या एका क्रमांकासाठी एकापेक्षा जास्त अर्ज प्राप्त झाल्यास त्यांची यादी कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. सदर अर्जांसाठी लिलावाचे डीडी दिनांक ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील व त्याच दिवशी दुपारी ४ वाजता सभागृहात लिलाव होईल.

दुचाकी वाहनांकरिता आकर्षक व पसंतीच्या क्रमांकांसाठी अर्ज ३० डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १०.३० ते दुपारी २.३० या वेळेत स्वीकारण्यात येणार आहेत. या अर्जांसाठीचे लिलावाचे डीडी ३१ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत स्वीकारले जातील व दुपारी ४ वाजता सहकार सभागृहामध्ये लिलाव आयोजित करण्यात येईल.

लिलावासाठी सादर करण्यात येणारे डीडी हे R.T.O., Pune या नावाने नॅशनलाइज्ड/शेड्युल्ड बँकेचे, पुणे येथील असणे आवश्यक असून ते दोन महिन्यांपेक्षा जुने नसावेत. प्रत्येक अर्जासोबत पॅनकार्डची साक्षांकित प्रत जोडणे अनिवार्य राहील. लिलावासाठी सादर करण्यात येणारा डीडी बंद पाकिटात एका अर्जासोबतच ग्राह्य धरला जाईल. Pune R.T.O. या नावाने सादर केलेले किंवा विहित शुल्कापेक्षा कमी रकमेचे डीडी बाद करण्यात येतील. एकाच अर्जदाराने एका क्रमांकासाठी एकाहून अधिक पाकिटे सादर केल्यास संबंधित अर्ज रद्द करण्यात येईल.

लिलाव प्रक्रियेमध्ये एखाद्या पसंतीच्या क्रमांकाला समान रकमेचे डीडी प्राप्त झाल्यास, संबंधित क्रमांकाची निश्चिती अर्जदारांच्या नावांच्या चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल. लिलाव प्रक्रियेदरम्यान अर्जदार उपस्थित असो अथवा नसो, संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात येईल. महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८१ च्या नियम ५४० नुसार पसंतीचा नोंदणी क्रमांक राखून ठेवण्याची वैधता १८० दिवस आहे. तथापि, आता एनआयसी पोर्टलमार्फत करण्यात आलेल्या बदलानुसार वैधता संपलेले पसंती क्रमांक पुन्हा जनतेसाठी पोर्टलवर उपलब्ध दिसून येतात.

वरील लिलाव प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर उर्वरित पसंती क्रमांकांचे वितरण ऑनलाईन पद्धतीने करण्यात येणार असून, नागरिकांनी https://fancy.parivahan.gov.in या संकेतस्थळावर नाव नोंदणी करून, अर्ज व शुल्क भरणा करून पसंतीचा नोंदणी क्रमांक आरक्षित करता येणार आहे. यासाठी कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित राहण्याची आवश्यकता राहणार नाही, असे प्रादेशिक परिवहन कार्यालय, पुणे यांनी कळविले आहे.

# डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर महापालिकेचा भर – आयुक्त श्रावण हर्डीकर



पिंपरी-प्रतिनिधी
महा मेट्रो

लोकशाहीची खरी ताकद ही नागरिकांच्या सक्रिय सहभागावर अवलंबून असते. मतदान हा केवळ हक्क नसून लोकशाहीप्रती आपले कर्तव्य आहे. प्रत्येक मत महत्त्वाचे असून त्याच्या माध्यमातून नागरिक आपल्या शहराच्या आणि प्रशासनाच्या भवितव्याची दिशा ठरवतात. त्यामुळे कोणताही नागरिक मतदानापासून वंचित राहू नये, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने मतदानाचा हक्क बजावणे अत्यंत आवश्यक आहे, असे प्रतिपादन आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांनी केले.

राज्य निवडणूक आयोग व पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मतदान जनजागृतीसाठी स्वीप कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने महापालिकेच्या वतीने तयार करण्यात आलेल्या मतदान जनजागृती चित्रफितीचे अनावरण आयुक्त तथा निवडणूक अधिकारी श्रावण हर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत माजी महापौर मधुकर पवळे सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमावेळी अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, निवडणूक विभागाचे उपायुक्त सचिन पवार यांच्यासह उपायुक्त अण्णा बोदडे, सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य माहिती तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे कर्मचारी उपस्थित होते.

आयुक्त श्रावण हर्डीकर म्हणाले, 'स्वीप कार्यक्रमांतर्गत तयार करण्यात आलेली ही चित्रफित नागरिकांपर्यंत सोप्या, प्रभावी आणि भावनिक पातळीवर पोहोचणारे माध्यम ठरेल. युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच प्रथमच मतदान करणारे मतदार यांना मतदानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी अशा नावीन्यपूर्ण उपक्रमांची आवश्यकता आहे. डिजिटल माध्यमांचा प्रभावी वापर करून अधिकाधिक नागरिकांपर्यंत मतदानाचा संदेश पोहोचविण्यावर महापालिकेचा भर राहील. या चित्रफितीच्या माध्यमातून नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होऊन मतदानाची टक्केवारी वाढण्यास मदत होईल,' असा विश्वासही यावेळी त्यांनी व्यक्त केला.

# जोरदार शक्तीप्रदर्शन करीत भाजपा उमेदवारांच्या प्रचाराचा शुभारंभ



पिंपरी- प्रतिनिधी
महा मेट्रो

पिंपळे सौदागर आणि रहाटणी परिसरात भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून लक्षवेधी विकासकामे झाली आहेत. प्रभागातील १२ उमेदवारांमध्ये कोणताही मनभेद नाही. ज्यांना उमेदवारी मिळेल, त्यांचे काम आम्ही 'भाजपा परिवार' म्हणून करणार आहोत, अशी भावना भाजपाचे उमेदवार आणि शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी व्यक्त केली.

पिंपरी-चिंचवड महापालिका निवडणुकीच्या प्रचारात भाजपाचे नगरसेवक उमेदवार शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्त्वात प्रभाग क्र. २८ (पिंपळे सौदागर-रहाटणी) क्षेत्रात प्रचार सुरू केला आहे. ग्रामदैवत श्री मुंजोबा मंदिरात आशीर्वाद घेण्यात आला. त्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिल्पासमोर प्रचाराची सुरुवात केली. यावेळी पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ, नागरिक संख्येने उपस्थित होते.

पिंपळे सौदागर-रहाटणी प्रभागात फाईव्ह गार्डन, शिवार गार्डन, प्लनेट मिलेनियम, कापसे लॉन, रामनगर, पिंपळे सौदागर, कुणाल आयकॉन, रोझ आयकॉन, गोविंद गार्डन प्रचार केले माझ्या प्रभागाच्या विकासासाठी, लोकांच्या भल्यासाठी आणि समाजाच्या प्रगतीसाठी मी कटिबद्ध आहे. यावेळी एकजूट आणि समर्पणाच्या साथीने हा विजय प्राप्त करू, अशी ठाम घोषणा काटे यांनी केली.

> माझ्या प्रभागाच्या प्रत्येक नागरिकाच्या हितासाठी, त्याच्या विकासासाठी आणि त्याच्या जीवनाच्या दर्जाच्या सुधारण्यासाठी मी सदैव कटिबद्ध आहे. आपल्यासमोर असलेल्या प्रत्येक समस्येचे निराकरण करण्यासाठी आणि प्रगतीची नवी दिशा दाखवण्यासाठी भारतीय जनता पार्टीने जे कार्य केले आहे, त्यात आम्ही अधिक योगदान देणार आहे. पिंपळे सौदागर, रहाटणी आणि या क्षेत्रातील सर्व नागरिकांमध्ये विश्वास निर्माण करण्याचे काम आम्ही खंबीरपणे सुरू ठेवणार आहे. पिंपळे सौदागर- रहाटणी सह पिंपरी-चिंचवड शहराच्या शाश्वत विकासासाठी कटिबद्ध राहण्याचा संकल्प आम्ही केला आहे.
>
> – शत्रुघ्न काटे, उमेदवार,
> शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी-चिंचवड.

# पिंपरी चिंचवड महापालिकेत डॉ. पंजाबराव देशमुख यांना अभिवादन; कृषी व ग्रामीण विकासातील योगदानाचा गौरव



पिंपरी - प्रतिनिधी
महा मेट्रो

थोर स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, कृषी शिक्षणाचे अग्रदूत आणि भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांना पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने आदरपूर्वक अभिवादन करण्यात आले. पिंपरी येथील महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमातून त्यांच्या बहुआयामी कार्याचा आणि राष्ट्रउभारणीतील योगदानाचा गौरव करण्यात आला.

महापालिकेचे उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी भारताचे पहिले कृषी मंत्री डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी महापालिकेचे मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अभिवादन प्रसंगी बोलताना उप आयुक्त अण्णा बोदडे यांनी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. ते म्हणाले की, डॉ. पंजाबराव देशमुख हे केवळ थोर स्वातंत्र्यसैनिकच नव्हते, तर समाजसुधारक आणि कृषी शिक्षणाचे खरे अर्थाने अग्रदूत होते. ग्रामीण भागातील शेतकरी आणि कष्टकरी समाजाच्या उन्नतीसाठी त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समर्पित केले.

स्वातंत्र्य चळवळीत सक्रिय सहभाग घेत असताना त्यांनी शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी सातत्याने आवाज उठवला. शेती, शेतकरी आणि ग्रामीण विकास या विषयांकडे राष्ट्रीय पातळीवर लक्ष वेधण्याचे महत्त्वपूर्ण कार्य त्यांनी केले. स्वतंत्र भारतात देशाचे पहिले कृषी मंत्री म्हणून जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांनी कृषी क्षेत्राला नवी दिशा देण्याचे काम केले, असेही उप आयुक्त बोदडे यांनी नमूद केले.

डॉ. पंजाबराव देशमुख यांनी अमरावती येथे श्री शिवाजी कृषी महाविद्यालयाची स्थापना करून कृषी शिक्षणात क्रांती घडवून आणली. या शिक्षण संस्थेच्या माध्यमातून त्यांनी ग्रामीण भागात शिक्षणाची ज्ञानगंगा पोहोचवली. शेतकरी आणि ग्रामीण युवकांना आधुनिक कृषी ज्ञान, संशोधन आणि विकासाच्या संधी उपलब्ध करून देण्यात त्यांचे योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या दूरदृष्टीमुळे हजारो तरुण शिक्षित झाले आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळाली. आजच्या काळातही डॉ. पंजाबराव देशमुख यांचे विचार आणि कार्य प्रेरणादायी असल्याचे उप आयुक्त बोदडे यांनी सांगितले. ग्रामीण विकास, शेतकरी कल्याण आणि शिक्षण यांचा समन्वय साधत त्यांनी देशाच्या प्रगतीसाठी जो मार्ग दाखवला, तो आजही तितकाच मार्गदर्शक आहे, असे त्यांनी नमूद केले.

या अभिवादन कार्यक्रमातून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या स्मृतींना उजाळा देत, त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प व्यक्त केला. त्यांच्या कार्यामुळे भारतीय कृषी क्षेत्राला लाभलेली दिशा आणि ग्रामीण समाजात घडलेला बदल आजही समाजाला प्रेरणा देत आहे.

# राजाराम पुलाच्या दुरुस्तीचे काम सुरु होणार; 'या' वेळेत पुल राहणार बंद



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

सिंहगड रस्त्यावरील राजाराम पुलाची आजपासून दुरुस्ती केली जाणार आहे. त्यामुळे या पुलाची एक लेन वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. हे काम १७ जानेवारीपर्यंत सुरू असणार आहे, अशी माहिती महापालिका प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी दिली.

राजाराम पुलाची २६ डिसेंबरपासून ते १७ जानेवारीपर्यंत दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. पुलाच्या दुरुस्तीचे काम केले जाणार आहे. त्यामुळे पुलावरील एक लेन वाहतुकीसाठी बंद राहणार आहे. दरम्यान हे काम रात्री ११ वाजल्यापासून ते पहाटे ५ पर्यंत काम चालणार आहे. एक लेन बंद असली तरी दुसरी लेन ही सुरू राहणार आहे. हे काम फक्त रात्री होणार आहे. दिवसा या दोन्ही लेन सुरू असणार आहेत. त्यामुळे दिवसा वाहतुकीची समस्या नसणार आहे, असे महापालिका प्रकल्प विभागाचे मुख्य अभियंता दिनकर गोजारे यांनी सांगितले.

कर्वेनगर आणि सिंहगड रस्त्याला जोडणारा राजाराम पूल आहे. या पुलावरून मोठ्या प्रमाणावर वाहतूक सुरु असते. सिंहगड रस्त्यावरील उड्डाणपुलामुळे ट्राफिक थोडेफार कमी झाले आहे. त्यामुळे जर दिवसा राजाराम पूल बंद केला. तर सिंहगड रोडवर पुन्हा ट्राफिक वाढण्याची शक्यता आहे. म्हणून दिवसभर पूल सुरु ठेवून रात्री बंद करण्यात येणार आहे. तसेच पुलाची एक लेन सुरु राहणार असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.

# पोलिसांवर गोळीबार करणाऱ्या टोळीकडून घरफोडीचे १२ गुन्हे उघड

पिंपरी - प्रतिनिधी
महा मेट्रो

शहरात घरफोडी आणि जबरी चोरी करणाऱ्या टोळीच्या मुसक्या आवळून २९ लाख ४४ हजार ७०० रुपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने जप्त केले आहेत. तपासात १२ गुन्हे उघड झाले आहेत. सोमाटणे टोलनाक्यावर एक महिन्यापूर्वी पोलिस आणि गुन्हेगार यांच्यात चकमक होऊन पोलिसांनी गुन्हेगारांच्या मुसक्या आवळल्या होत्या.

गुन्हे शाखेने सनीसिंग पापासिंग दुधानी (वय २४, रा. हडपसर), जलसिंग रजपूतसिंग दुधानी (३२, रा. हडपसर), मनीष बाबूलाल कुशवाह (२८ रा. कैलास, मूळ रा. मध्य प्रदेश) यांना अटक केली आहे. हिंजवडी पोलिस हद्दीत २३ नोव्हेंबरला रात्री घरफोडी करून सेलेरिओ (एमएच- १४, जेई- २६२८) या गाडीची चोरी केल्याची नोंद रावेत पोलिस ठाण्यात झाली होती. त्यानंतर पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे यांनी या प्रकरणाची दखल घेत तपासाचे आदेश दिले. त्यावेळी २०० सीसीटीव्ही कॅमेऱ्यांची पाहणी केली. त्यावेळी ही टोळी जुन्या पुणे-मुंबई महामार्गाने लोणावळ्याच्या दिशेने जात असल्याची माहिती मिळाली होती. त्यानंतर २७ नोव्हेंबरच्या रात्री वरिष्ठ पोलिस निरीक्षक अरविंद पवार यांनी आपल्या टीमसह सोमाटणे टोलनाक्यावर सापळा रचला. पहाटे ५:३० च्या सुमारास संशयित गाडी लेन नंबर ३ मध्ये येताच पोलिसांनी ती अडवली. त्यावेळी गाडीत मागे बसलेल्या एकाने पोलिसांच्या दिशेने गोळीबार केला. मात्र, ही गोळी गाडीच्या दरवाजाला लागली. याचवेळी अंमलदार राठोड यांची आरोपीशी झटापट झाली. संशयितांच्या हातातील पिस्तूल हिसकावून घेतले. अटक केली.

त्यानंतर या प्रकरणाचा तपास सुरू होता. त्यानुसार ताब्यातून २९ लाख ४४ हजार ७०० रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने, दोन पिस्तूल आणि सात जिवंत काडतुसे, चोरीसाठी वापरलेली सेलेरिओ कार, हत्यारे जप्त केली आहेत.

सनीसिंग दुधानीवर तब्बल ७१ गुन्हे दाखल असून तो 'मोका'मधून नुकताच बाहेर आला होता. जलसिंग दुधानीवर ५६, तर मनीष कुशवाहवर ७१ गुन्हे दाखल आहेत. त्यांच्याकडून दागिने विकत घेणारे किरपानसिंग शीतलसिंग दुधानी (३७, रा. भैरवनाथनगर, कुसगाव), शांताराम ऊर्फ संतोष कांबळे (३०, रा. भैरवनाथनगर, कुसगाव) आणि अक्षय राजू चनाल (३०, रा. शिवाजी पेठ, खंडाळा) या सहकाऱ्यांनाही अटक केली आहे.

# सावधान..! 'तुमच्या गाडीचे ई-चलन भरा' म्हणणारे ॲप ठरतेय फसवे

पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

'तुमच्या गाडीचे चलन भरा' असा मेसेज किंवा ॲप लिंक पाठवून नागरिकांची फसवणूक करणाऱ्या सायबर गुन्हेगारांनी नवा प्रकार सुरू केला असून, ई-चलनाच्या नावाखाली पाठवण्यात येणारी एपीके फाईल मोबाइल हॅक करत असल्याचे गंभीर प्रकार उघडकीस आले आहेत. दौंड तालुक्यातील केडगाव येथील एका पोलिसाच्या मोबाइलवर व्हॉट्सॲप ग्रुपद्वारे ई-चलनाची एपीके फाईल प्राप्त झाली. चलन आले आहे का, दंड किती आहे, याची माहिती पाहण्यासाठी त्यांनी सदर फाईल उघडली. मात्र, ती फाईल ओपन करताच मोबाइलमध्ये परस्पर तीन संशयास्पद ॲप्लिकेशन्स इन्स्टॉल झाली आणि काही क्षणातच मोबाइलचा संपूर्ण ताबा सायबर भामट्यांनी घेतला.

यानंतर संबंधित पोलिस अधिकाऱ्याच्या मोबाइलमधून त्यांच्या मित्र-परिवाराला 'मी हॉस्पिटलमध्ये आहे, तातडीने पैशांची गरज आहे' असे मेसेज पाठवले जाऊ लागले. व्हॉट्सॲपचा डीपी बदलण्यात आला होता. तसेच, फसवणूक करणाऱ्या व्यक्तीने स्वतःचा मोबाइल क्रमांक देऊन त्या नंबरवर पैसे पाठवण्याचे आवाहन केले. असाच प्रकार कुरकुंभ (ता. दौंड) येथील एका संगणक शिक्षकाच्या मोबाइलसोबतही घडला. त्यांच्याही मोबाइलमधून मित्रांना आर्थिक मदतीचे मेसेज पाठवण्यात आले. काही मित्रांनी पैसेही पाठवले; तर काहींनी तत्काळ फोन करून मोबाइल हॅक झाल्याची माहिती दिली. त्यानंतर संबंधित व्यक्तींनी स्टेटसद्वारे नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले.

या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, माहीत नसलेल्या लिंक, ॲप किंवा एपीके फाईल्स उघडू नयेत अथवा इन्स्टॉल करू नयेत, असे आवाहन यवतचे पोलिस निरीक्षक नारायण देशमुख यांनी केले आहे. तसेच, अशा संशयास्पद फाईल्स इतरांना फॉरवर्ड करू नयेत आणि कोणताही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी खात्री करूनच पावले उचलावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. सायबर फसवणूक वाढत असल्याने नागरिकांनी अधिक सतर्क राहण्याची गरज असून, संशयास्पद प्रकार आढळल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**सायबर सेफ्टी : स्वतःला कसे सुरक्षित ठेवाल?**

१. फक्त अधिकृत ॲप्सच डाउनलोड करा- गुगल प्ले स्टोअर किंवा अधिकृत सरकारी संकेतस्थळाशिवाय कुठलेही ॲप इन्स्टॉल करू नका.

२. ई-चलनाची खात्री करा- ई-चलनाची माहिती फक्त परिवहन, महा ट्रॅफिक किंवा अधिकृत एसएम एसद्वारेच तपासा.

३. अनोळखी लिंक/फाईल उघडण्यापूर्वी विचार करा - एपीके, पीडीएफ, झिप अशा फाईल्स संशयास्पद असू शकतात.

४. दोन स्तरांची सुरक्षा वापरा - व्हॉट्सॲप, ई-मेल, बँकिंग ॲप्ससाठी दोन टप्प्यांची सुरक्षा सुरू ठेवा.

५. मोबाइल लॉक व ॲप लॉक वापरा - पॅटर्न/पिन/फिंगरप्रिंटने मोबाइल सुरक्षित ठेवा.

६. संशयास्पद प्रकार दिसताच तत्काळ कारवाई करा - मोबाइल हॅक झाल्याची शंका आल्यास इंटरनेट बंद करा व तज्ज्ञांची मदत घ्या.

**हे टाळा :**

१. एपीके फाईल्स उघडू नका.

२. 'तुमचे चलन भरा' असा घाईचा मेसेज आल्यास लगेच प्रतिसाद देऊ नका.

३. ओटीपी, बँक तपशील, यूपीआय पिन कोणालाही सांगू नका.

४. संशयास्पद मेसेज पुढे फॉरवर्ड करू नका.

५. ओळखीचा नंबर असला तरी पैशांची मागणी खात्रीशिवाय मान्य करू नका.

# विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडण्याची सामूहिक जबाबदारी - डॉ. हर्षदीप कांबळे

## सामाजिक न्याय विभागाच्या प्रधान सचिवांकडून विजयस्तंभाच्या प्रत्यक्ष जागेवर जाऊन तयारीची पाहणी



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या स्वातंत्र्य, समता व बंधुतेच्या मूल्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून विजयस्तंभ अभिवादन सोहळा शांततेत पार पाडणे, ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. यासाठी प्रशासन, सामाजिक संघटना व नागरिकांनी परस्पर समन्वय साधून सोहळा हा यशस्वी करावा. प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे अनुयायांनी पालन करून सहकार्य करावे, असे आवाहान सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. हर्षदीप कांबळे यांनी केले.

हवेली तालुक्यातील पेरणे फाटा येथील विजयस्तंभ परिसरास भेट देऊन १ जानेवारी २०२६ रोजी साजरा होणाऱ्या विजयस्तंभ अभिवादन सोहळ्याच्या अनुषंगाने विविध विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीचा आढावा घेताना ते बोलत होते. यावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी)चे महासंचालक सुनील वारे, समाजकल्याण आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे, पोलीस अधीक्षक संदीप गिल, पुणे शहरचे पोलीस उपायुक्त सोमय मुंडे, उत्पादक शुल्क अधीक्षक अतुल कानडे, समाज कल्याण विभागाच्या प्रादेशिक उपायुक्त वंदना कोचुरे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता अनुराधा भंडारे, उपविभागीय अधिकारी यशवंत माने, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, गट विकास अधिकारी शेखर शेलार, बार्टीचे विभाग प्रमुख डॉ. बबन जोगदंड तसेच विजयस्तंभ स्मारक समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

डॉ. कांबळे म्हणाले की, देशभरातून मोठ्या संख्येने अनुयायी १ जानेवारी रोजी विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी पेरणे फाटा येथे येतात. यंदा गेल्या वर्षीपेक्षा विविध कारणांनी वाढणारी संभाव्य गर्दी लक्षात घेऊन अनुयायांना आवश्यक सोई-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने काटेकोर नियोजन करावे. येणाऱ्या अनुयायांना कोणतीही अडचण येणार नाही, याची दक्षता घेऊन सर्व कामे नियोजित वेळेत पूर्ण करावीत, असे निर्देश त्यांनी दिले. विविध विभागांकडून सादर करण्यात आलेल्या मागण्यांबाबत सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे प्राप्त प्रस्तावांना आजच मान्यता देण्यात येईल. आणखी काही मागण्या असल्यास तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे निर्देशही डॉ. कांबळे यांनी दिले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी विजयस्तंभास दिलेल्या भेटीला सन २०२७ मध्ये १०० वर्षे पूर्ण होत असून, या पार्श्वभूमीवर भविष्यात येणाऱ्या अनुयायांची वाढती गर्दी लक्षात घेता प्रशासनाने आतापासूनच दीर्घकालीन पूर्वतयारी करावी, असेही त्यांनी सांगितले.

बैठकीत संबंधित विभागांकडून करण्यात येणाऱ्या पूर्वतयारीबाबत माहिती देण्यात आली. यामध्ये विजयस्तंभ सजावट, रुग्णवाहिका, आरोग्य केंद्र, औषध साठा, रुग्णालयांतील खाटांचे आरक्षण, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याचे टँकर, घंटागाडी, हिरकणी कक्ष, बसेसचे नियोजन, विद्युत व्यवस्था, पुस्तक विक्री स्टॉल, शौचालये, वाहनतळ, रस्ते दुरुस्ती, कायदा व सुव्यवस्था, वाहतूक व्यवस्थापन, गर्दी नियंत्रण, पोलीस बंदोबस्त, सीसीटीव्ही, आपत्कालीन प्रतिसाद, समाजमाध्यमांचे सनियंत्रण, नियंत्रण कक्ष, बिबट व सर्प प्राणी व्यवस्थापन तसेच आवश्यक मनुष्यबळ आदींचा समावेश आहे. याठिकाणी करण्यात आलेल्या पूर्वतयारीबाबत सम ाधान व्यक्त करत ही माहिती मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच सामाजिक न्याय मंत्री यांना कळविण्यात येईल, असेही डॉ. कांबळे यांनी सांगितले.

# एकात्मतेचा संदेश देणारी फुलांची सजावट होणार

पेरणे फाटा येथील विजयस्तंभ शौर्य दिन कार्यक्रमासाठी जोरदार तयारी सुरू असून, १ जानेवारी रोजी २०८ वा शौर्य दिन साजरा केला जाणार आहे. यंदा विजयस्तंभावर एकात्मता, संविधानिक मूल्ये आणि राष्ट्रीय ऐक्याचा संदेश देणारी भव्य फुलांची सजावट करण्यात येणार आहे.

भारतीयसंविधानाला७५वर्षेपूर्णझाल्याच्या पार्श्वभूमीवर 'भारतीय संविधान अमृत म होत्सव'अंतर्गत २६ नोव्हेंबर २०२४ ते २६ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत 'घर घर संविधान' आणि 'हमारा संविधान, हमारा स्वाभिमान' या उपक्रमांद्वारे संविधानाची मूल्ये जनतेपर्यंत पोहोचवली जात आहेत. या संकल्पनेनुसार यंदाच्या विजयस्तंभ सजावटीत सुमारे २ हजार किलो कृत्रिम व नैसर्गिक फ ुलांचा वापर करण्यात येणार आहे.



सजावटीत 'सत्यमेव जयते', न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुता या संविधानिक मूल्यांचा ठळक संदेश देण्यात येणार असून, भारतीय तिरंगा विशेष आकर्षण ठरणार आहे. निळ्या रंगाच्या फुलांमधून भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे तैलचित्र, भारताचे राष्ट्रीय बोधचिन्ह, अशोक स्तंभ आणि 'सत्यमेव जयते' घोषवाक्य साकारण्यात येणार आहे.

सजावटीच्याखालच्याभागाततिन्हीबाजूंना महार रेजिमेंटचे चिन्ह, तर समोरील बाजूस डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १९२७ साली विजयस्तंभास दिलेल्या भेटीचे तैलचित्र असणार आहे. सजावटीसाठी झेंडूच्या कृत्रिम व नैसर्गिक फुलांसह भगवा, हिरवा, निळा, पिवळा, पांढरा आणि लाल रंगाच्या फुलांचा वापर केला जाण-ार आहे. २७ डिसेंबरपासून प्रत्यक्ष सजावटीला सुरुवात होणार असल्याची माहिती विजय रणस्तंभ सेवा समितीचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे यांनी दिली. या सजावटीस जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, बार्टीचे महासंचालक सु-नील वारे आणि निबंधक विशाल लोंढे यांनी मान्यता दिली आहे. अनुयायांच्या संकल्पनेतून ही सजावट साकारली जात असून, यावेळी रिपब्लिकन विद्या-र्थी सेना प्रदेशाध्यक्ष विवेक बनसोडे, रिपब्लिकन कामगार सेना महाराष्ट्र प्रमुख युवराज बनसोडे, सच्चितानंद कडलक, दीपिका भालेराव, नीलेश गायकवाड, दीक्षांत भालेराव, आकाश शिंदे आदी उपस्थित होते. दरवर्षी विजयस्तंभाची सजावट नैसर्गिक फुलांच्या माध्यमातून केली जात होती. मात्र, गेल्या काही वर्षांपासून नैसर्गिक व कृत्रिम फ ुलांच्या माध्यमातून सजावट करत सामाजिक व संविधानिक संदेश देण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे अध्यक्ष सर्जेराव वाघमारे यांनी सांगितले.

# शहराच्या अनेक भागांचा पाणीपुरवठा विस्कळीत; कर्वेनगर, रामटेकडी येथे जलवाहिनी फुटली



पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे शहरातील खडकवासला ते वारजे आणि होळकर ही पाणीपुरवठा जलवाहिनी कर्वेनगर येथे फुटली. महापालिका प्रशासन तातडीने दुरुस्तीचे काम सुरू केले आहे. शुक्रवारी रात्री उशिरापर्यंत हे काम सुरू होते. त्यामुळे कर्वे नगर, प्रभात रोड, कोथरूड, बाणेर, बालेवाडी, औंध, चिकलवाडी, खडकी आणि शिवाजीनगर या भागाचा पाणीपुरवठा विस्कळीत झाला आहे.

कर्वेनगरनंतर रामटेकडी टाकीला पाणीपुरवठा करणारी मुख्य पम्पिंग लाईन अचानक फुटल्याने दुरुस्ती करण्याचे काम तातडीने हाती घेतले आहे. त्यामुळे रामटेकडी टाकीच्या अखत्यारीतील भागाचा शनिवारपर्यंत पाणीपुरवठा बंद राहणार आहे. संपूर्ण हडपसर, हडपसर गावठाण, ससाणे नगर, रेल्वे लाइन कडेचा भाग, मंत्री मार्केट, गंगा रेसिडेन्सी, साईनाथ वसाहत, गाडीतळ, चिंतामणी नगर, सय्यदनगर, हडपसर इंड्रस्ट्रीयल इस्टेट, शिंदेवस्ती, भीमनगर, संपूर्ण रामटेकडी, रामटेकडी इंडस्ट्रीयल एरिया, हेवन पार्क, गोसावी वस्ती, शंकर मठ, वैदुवाडी, आनंदनगर, एसआरपीएफ महंमदवाडी गाव, तरवडे वस्ती, कृष्णानगर, सातवनगर, राजीव गांधीनगर, दोराबजी पॅराडाइज, कडनगर बूस्टरवरील भाग, तुकाई दर्शन टाकी- सातववाडी, गोंधळेनगर, उन्नतीनगर व काळेपडळ, हडपसर-सोलापूर रोड डावी बाजू, साडेसतरा नळी, भोसले गार्डन, माळवाडी, मगरपट्टा सिटी, हडपसर आकाशवाणी, पिंगळेवस्ती, मुंढवा, केशवनगर, चिंतामणी नगर, हांडेवाडी रोड, सातवनगर, गुलामअली नगर, श्रीराम चौक परिसर, रामटेकडी, राम नगर परिसर अंतर्गत होणारा भागातील पाणीपुरवठा बंद असणार आहे.

# शिंदेसेनेच्या बैठकीत राडा? शहरप्रमुख नाना भानगिरे रागारागात बाहेर पडले आणि गेले निघून



पुणे - प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे महापालिका निवडणुकीमध्ये शिंदेसेनेला सोबत घेण्याची भूमिका भाजपाने घेतली आहे. मात्र, शिंदेसेनेला जागा देण्याबद्दलच्या मुद्द्यावरून संघर्ष सुरू झाला आहे. शिंदेसेनेच्या नेत्या नीलम गोऱ्हे यांच्या घरासमोर शिवसैनिकांनी ठिय्या दिला होता. त्यानंतर आता शिंदेसेनेच्या दोन नेत्यांमध्येच बैठक सुरू असताना राडा झाला. यानंतर शिंदेसेनेचे पुणे शहरप्रमुख नाना भानगिरे रागारागात निघून गेले. त्यामुळे शिंदेसेनेत जागांवरून खदखद असल्याच्या चर्चेला तोंड फुटले आहे.

पुणे महापालिका निवडणुकीत भाजपाने राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाला दूर ठेवले आहे, तर शिंदेसेनेला सोबत घेतले आहे. पण, जागावाटपाचा पेच सुटलेला नाही. शिंदेसेनेकडून ३५ जागांची मागणी करण्यात आली आहे. तर भाजपाकडून १५ जागांचाच प्रस्ताव देण्यात आला आहे. त्यामुळे शिंदेसेनेमध्ये अस्वस्थता आहे.

दरम्यान, शनिवारी शिंदेसेनेच्या नेत्यांची पुण्यातील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये बैठक बोलावण्यात आली. या बैठकीला विजय शिवतारे, नीलम गोऱ्हे यांच्यासह पक्षाचे शहरातील प्रमुख नेते होते. याच बैठकीत शिंदेसेनेच्या नेत्यांमध्ये वाद झाला. जी माहिती सध्या समोर आली आहे, त्यानुसार, शिंदेसेनेच्या बैठकीत वाद झाला. पक्षाचे पुणे शहरप्रमुख नाना भानगिरे आणि आमदार विजय शिवतारे यांच्यात वादावादी झाली. त्यात भानगिरे यांना शिवीगाळ करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली.

बैठकीत मिळालेल्या वागणुकीनंतर नाना भानगिरे हे रागारागात हॉटेलमधून बाहेर पडले. त्यांची समजूत घालण्यासाठी नीलम गोऱ्हे यांची स्वीय सहाय्यक आले. मात्र, भानगिरे हे निघून गेले. नाना भानगिरे यांचा रागात निघून जातानाचा व्हिडीओही व्हायरल झाला आहे.

दरम्यान, बैठकीला असलेल्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांना याबद्दल माध्यमांनी प्रश्न केला. त्यावर गोऱ्हे म्हणाल्या की, भानगिरे यांना एक कॉल आला होता. त्यांना एक निरोप आला होता. ते तुम्हाला काय बोलले मला माहिती नाही. त्यांचा गैरसमज नक्की दूर केला जाईल. सध्या पुण्यात भाजपाने शिंदेसेनेला १५ जागांचा प्रस्ताव दिलेला आहे. या प्रस्तावानंतर शिंदेसेनेत नाराजीची लाट आहे. काही पदाधिकारी आणि स्थानिक नेत्यांनी नीलम गोऱ्हे यांच्या घरासमोर शुक्रवारी ठिय्या दिला. भाजपाच्या सांगण्यांनुसार शिवसेना चालणार का? असा सवाल पदाधिकाऱ्यांनी पक्षाच्या नेत्यांना केला.

त्यानंतर आज झालेल्या बैठकीत यावर तोडगा निघेल अशी आशा होती. पण, त्यात नवाच वाद उफाळून आला आहे. त्यामुळे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची डोकेदुखी वाढली आहे, अशी चर्चाही यानिमित्ताने सुरू झाली.

# 'नेकी का काम आंदेकर का नाम..' बघा मला लोकशाहीत कसं आणलय'; उमेदवारी अर्ज भरताना बंडू आंदेकरची घोषणाबाजी



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

शहरातील कुख्यात आंदेकर टोळीचा म्होरक्या बंडू आंदेकर आज महापालिका निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केला. पुण्यातील भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात हा अर्ज दाखल करण्यात आला असून, त्यासाठी कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. सुरवातीला सोनाली वनराज आंदेकर आणि लक्ष्मी उदयकांत आंदेकर यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

यावेळी उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी पोलीस बंदोबस्तात आलेल्या बंडू आंदेकरने घोषणा दिल्या, नेकी का काम आंदेकर का नाम, बघा बघा मला लोकशाहीत कसं आणलंय, आंदेकरांना मत म्हणजे विकासकामाला मत अशा घोषणा त्याने दिल्या. दोरखंड बांधलेल्या अवस्थेत आंदेकरला पोलिसांनी उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भवानी पेठ क्षेत्रीय कार्यालयात आणले होते. यावेळी माध्यमांसमोरून जात असताना बंडू आंदेकरने मी उमेदवार आहे, दरोडेखोर नाही अशी घोषणा देत आंदेकरांनी आपली भूमिका स्पष्ट केल्याचं पाहायला मिळालं. लोकशाही मार्गानेच जनतेच्या पाठबळावर आपण निवडणूक लढवत असल्याचा दावा त्यांनी केला. इतकेच नाही तर त्याने यावेळी वनराज आंदेकर जिंदाबादच्या घोषणाही दिल्या.

या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर, आयुष कोमकरच्या आई संजीवनी कोमकर यांनी माध्यमांशी बोलताना आंदेकर कुटुंबियांना कोणत्याही राजकीय पक्षाने उमेदवारी देऊ नये, अशी कळकळीची विनंती केली होती.'जर आम्हाला न्याय देता येत नसेल, तर किमान अन्याय तरी करू नका. माझ्या लहान मुलाचं आयुष्य उद्ध्वस्त करण्यात आलं आहे. सत्ता होती म्हणून त्यांनी आजवर सर्व काही केलं. कृपया त्यांना निवडणुकीचं तिकीट देऊ नका' असे त्या म्हणाल्या.

तसेच, जो पक्ष आंदेकरांना तिकीट देईल, त्या पक्षाच्या कार्यालयासमोर जाऊन मी आत्मदहन करेन. मला माझ्या गोविंदाला न्याय हवा आहे. एवढेच मला पाहिजे.. अशी भावनिक प्रतिक्रिया संजीवनी कोमकर यांनी व्यक्त केली होती. या संपूर्ण घटनेमुळे पुण्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण तापले असून, आज होणाऱ्या उमेदवारी अर्ज दाखल प्रक्रियेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# उमेदवारी अर्ज भरण्यास सोमवारपासून उडणार झुंबड; पक्षांनी अजूनही जाहीर केले नाहीत अधिकृत उमेदवार

पिंपरी - प्रतिनिधी
महा मेट्रो

महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी मंगळवारपासून (दि. २३ डिसेंबर) उमेदवारी अर्जांचे वितरण आणि अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरू झाली. मात्र, शुक्रवार (दि. २६) अखेर फक्त १३ जणांनी अर्ज भरले आहेत. अर्ज भरण्याची अंतिम मुदत ही मंगळवारपर्यंत (दि. ३०) आहे. त्यामुळे शेवटच्या दोन दिवसांमध्ये म्हणजेच सोमवारी आणि मंगळवारी अर्ज भरण्यासाठी गर्दी होणार आहे. मात्र, प्रत्यक्षात अर्ज दाखल करण्यापेक्षा राजकीय गणिते मांडण्यावरच सध्या अधिक भर दिसून येत आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे आजपर्यंत कोणत्याही प्रमुख पक्षाने अधिकृत उमेदवारांची यादी जाहीर केलेली नाही. भाजप, राष्ट्रवादी (शरद पवार), (अजित पवार), शिवसेना (उद्धवसेना), (शिंदेसेना) यांच्यामध्ये अंतर्गत बैठका, सर्वेक्षणे, संभाव्य आघाड्यांची गणिते आणि स्थानिक समीकरणांवर चर्चा सुरू आहे. यामुळे इच्छुक उमेदवार अक्षरशः 'वेट ॲण्ड वॉच'च्या भूमिकेत अडकले आहेत. तिकीट मिळेल की नाही, याबाबत अनिश्चितता असल्याने अनेकांनी अर्ज तयार ठेवून शेवटच्या क्षणाची वाट पाहणे पसंत केले आहे.

आज शनिवार असल्याने आज अर्ज दाखल करणाऱ्यांची संख्या मर्यादित राहण्याची शक्यता आहे. रविवारी सार्वजनिक सुटी असल्यामुळे अर्ज स्वीकृती बंद राहणार असल्याने, उर्वरित केवळ सोमवार (दि. २९) आणि मंगळवार (दि. ३०) हे दोनच दिवस शिल्लक राहणार आहेत. त्यामुळे या दोन दिवसांत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमध्ये अर्ज भरण्यासाठी मोठी गर्दी, धावपळ आणि गोंधळाचे चित्र दिसण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, पक्षांकडून शेवटच्या क्षणी उमेदवारांची घोषणा होण्याची परंपरा लक्षात घेता अनेक इच्छुकांनी 'सेफ साइड' म्हणून अपक्ष अर्ज दाखल करण्याची तयारी ठेवली आहे. तिकीट मिळाल्यास अपक्ष अर्ज मागे घेण्याची, तर तिकीट न मिळाल्यास अपक्ष म्हणूनच मैदानात उतरण्याची रणनीती आखली जात आहे. यामुळे अंतिम टप्प्यात अर्जांची संख्या झपाट्याने वाढण्याची चिन्हे आहेत. प्रभागनिहाय पाहता विद्यमान नगरसेवक, माजी नगरसेवक आणि नवोदित उमेदवारांमध्ये तीव्र स्पर्धा आहे. काही प्रभागांत पक्षांतर्गत नाराजी उघडपणे दिसून येत असून, संभाव्य बंडखोरीचे संकेतही मिळत आहेत. याचा थेट परिणाम उमेदवारी अर्जांच्या संख्येवर होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

# ढोले पाटील ज्युनिअर कॉलेजचे प्रा. प्रशांत इंगोले यांना पुणे विद्यापीठाची पीएचडी प्रदान

पुणे -प्रतिनिधी
महा मेट्रो




ढोले पाटील ज्युनिअर कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथील इंग्रजी विषयाचे अध्यापक प्रा. प्रशांत इंगोले यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या वतीने पीएचडी (Doctor of Philosophy) पदवी प्रदान करण्यात आली.

उच्च शिक्षण व संशोधन क्षेत्रात सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध संशोधन आणि शैक्षणिक गुणवत्तेच्या जोरावर त्यांनी ही उल्लेखनीय शैक्षणिक कामगिरी साध्य केली आहे. त्यांच्या या यशाबद्दल संस्थेचे सन्माननीय चेअरमन सागर ढोले पाटील यांनी प्रा. इंगोले यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले तसेच त्यांच्या पुढील शैक्षणिक व संशोधनात्मक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

संस्थेतील शिक्षकांच्या संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या धोरणाचा हा एक सकारात्मक परिणाम असून, प्रा. प्रशांत इंगोले यांचे यश विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरणारे आहे. म्हणून सन्माननीय चेअरमन सर यांनी त्यांना प्रोत्साहन म्हणून विशेष बाब म्हणून पारितोषिक जाहीर केले.सन्माननीय चेअरमन सर यांचे आभार मानून प्रा इंगोले यांचे प्राचार्य प्रा. विठ्ठल गायकवाड यांनी अभिनंदन केले.

# श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिर ९ जानेवारीपासून ३ महिन्याकरिता बंद; मात्र महाशिवरात्रीला दर्शनासाठी खुले राहणार - जिल्हाधिकारी



पुणे- प्रतिनिधी
महा मेट्रो

श्री क्षेत्र भीमाशंकरमंदिरातील देखभाल दुरुस्तीच्या अनुषंगाने मंदिर भाविकांसाठी ९ जानेवारी २०२६ पासून पुढील ३ महिन्यांसाठी महाशिवरात्रीचा कालावधी वगळून भाविकांना दर्शनाकरिता बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. भाविकांनी सहकार्य करावे- असे आवाहन जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी केले आहे.

राज्य शासनाने १२ ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या श्री क्षेत्र भीमाशंकर मंदिराच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष विकास आराखड्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. या आराखड्यातील अत्यंत महत्त्वाच्या टप्प्याची अंमलबजावणी तसेच प्रत्यक्ष बांधकामाच्या काळातील सुरक्षितता लक्षात घेता २३ डिसेंबर रोजी जिल्हा प्रशासन, श्री क्षेत्र भीमाशंकर देवस्थान संस्थानचे विश्वस्त, स्थानिक दुकानदार व श्री. भीमाशंकर ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत संयुक्त बैठकीत सर्वांच्या सहमतीने हा निर्णय घेण्यात आला आहे. तथापि भाविकांच्या सोयी करिता महाशिवरात्रीच्या कालावधीमध्ये मंदीर भाविकांकरिता दर्शनाकरिता खुले राहणार आहे.

सन २०२७ मध्ये त्र्यंबकेश्वर, नाशिक येथे सिंहस्थ कुंभमेळ्याचे आयोजन होणार आहे. त्यापूर्वी प्रयागराज येथे झालेल्या महाकुंभ २०२५ च्या अनुभवावरून कुंभमेळ्याच्या काळात नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे येणाऱ्या लाखो भाविकांकडून श्री क्षेत्र भीमाशंकर येथे दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर कुंभमेळ्यापूर्वी आवश्यक पायाभूत सुविधा, सभामंडप, सुरक्षित प्रवेश-निर्गमन व्यवस्था तसेच गर्दी नियंत्रणाची कामे वेळेत पूर्ण करणे हे प्रशासनाचे प्राथमिक उद्दिष्ट आहे. कामाचे स्वरूप व व्याप्ती लक्षात घेता भाविकांची सुरक्षितता अबाधित राखण्यासोबतच कामे नियोजनबद्ध व कालमर्यादेत पूर्ण करणे आवश्यक असल्याने मंदिर परिसर भाविकांसाठी तात्पुरता बंद करण्यात येणार आहे.

# निवडणुकीच्या कामासाठी हजर न झाल्याने अस्मिता गाडीवडर निलंबित

पुणे -प्रतिनिधी
महा मेट्रो

पुणे महापालिका निवडणुकीच्या कामासाठी हजर न झाल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंता अस्मिता गाडीवडर यांना निलंबित करण्यात आले आहेत. पुणे महापालिकेच्या निवडणूक कार्यालयाच्या मनुष्यबळ व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त प्रशांत ठोबंरे यांनी याबाबतचे आदेश दिले आहेत. पुणे म हापालिकेची निवडणूक जाहीर झाली आहे. त्यामुळे निवडणूक कामकाज हे राष्ट्रीय कर्तव्य असून, याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम ाच्या कलम १४ मधील तरतूद राज्य निवडणूक आयोगाचे वेळोवेळी आदेश विचारात घेऊन विविध कार्यालयाकडील कर्मचाऱ्यांच्या निवडणूक विषयक कामासाठी उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मात्र काही कर्मचारी हे त्यांना नेमून न दिलेल्या कार्यालयांकडे हजर न झाल्याने निवडणूक विषयक कामामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

त्यामुळे कोंढवा येवलेवाडी क्षेत्रीय कार्यालयाकडे नियुक्ती केली असताना कर्तव्यावर हजर राहिल्या नाही. त यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कनिष्ठ अभियंता अस्मिता गाडीवडर यांना निलंबित करण्यात आले आहेत.